Impact Factor – 6.625

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2020 Special Issue – 215

## INDIAN ECONOMIC SLOWDOWN
## Causes, Effects and Remidies



**Guest Editor:**
Dr. R. J. Temkar
Principal,
Dada Patil Rajale Arts, Science & Commerce College, Adinathnagar, Tal. Pathardi, Dist. Ahmednagar, (M.S.) India.

**Associate Editors of the issue:**
Dr. N. H. Bhise
Dr. D. R. Dalve
Dr. B. S. Jagtap

**Chief Editor:**
Dr. Dhanraj Dhangar

**Executive Editor:**
Dr. S. J. Deshmukh
HoD, Economics & Incharge Commerce Faculty
Dada Patil Rajale College,
Arts, Science & Commerce
College, Adinathnagar, Tal. Pathardi,
Dist. Ahmednagar, (M.S.) India.

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | | |
|---|---|---|---|
| 32 | Race for Global Economic Power (Super Power) between India and China | Dr. Pratima Jogdand | 113 |
| 33 | भारतीय अर्थव्यवस्थेची घसरण : कारणे व उपाय | डॉ. अजयकुमार पालवे | 116 |
| 34 | भारतीय अर्थव्यवस्थेची घसरण : कारणे,परिणाम आणि उपाय | डॉ. अशोक देवकर | 121 |
| 35 | भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासातील शेतीची भूमिका | डॉ. सुभाष देशमुख, ऋषीकेश भगत | 127 |
| 36 | भारतातील पायाभूत संरचना आणि विकास | डॉ. नरसिंग देशमुख | 132 |
| 37 | भारतातील मानवी संसाधन विकास : सद्यस्थिती व आव्हाने | डॉ. हनुमंत शिंदे | 135 |
| 38 | भारतीय अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती | डॉ. एस.एस.नाळे, डॉ. वाय.बी.खलाटे | 143 |
| 39 | भारतातील पायाभूत सुविधांचे महत्त्व आणि समस्या | डॉ. बी.व्ही.गव्हाळे | 146 |
| 40 | आर्थिक घसरणीचा भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रावर झालेला परिणाम एक अभ्यास | डॉ. विलास नरवडे | 151 |
| 41 | भारतीय आर्थिक घसरण कारणे व उपाय | डॉ. ज्ञानदेव झिने | 153 |
| 42 | भारतीय अर्थव्यवस्थे बदलते स्वरूप | श्रीमती जयश्री सिनगर | 156 |
| 43 | भारतातील परकीय प्रत्येक्ष गुंतवणुकीचा अभ्यास | आश्रु मोरे, डॉ. एम.व्ही.तेगमपुरे | 161 |
| 44 | भारतीय अर्थव्यवस्थेतील रोजगारीचे आव्हान आणि पुनर्रचित कृषी ग्रामीण अर्थव्यवस्था एक संधी | प्रा. नितीन मालाणी | 165 |
| 45 | भारतीय अर्थव्यवस्थेतील क्षेत्रीय संरचनात्मक बदल | प्रा. केदार रामनाथ महादेव | 169 |
| 46 | आर्थिक मंदी की विकासाची घसरण | प्रा. एम.के.सानप (पालवे) | 172 |
| 47 | कृषी क्षेत्र : पुरक व्यवसाय आणि संधी | डॉ. अनिल पानखडे, प्रा. सुनिल पानखडे | 175 |
| 48 | महाराष्ट्र राज्यातील बेरोजगारी एक समस्या | राजरत्न पोहेकर, डॉ. सुरेश ढाके | 180 |
| 49 | आर्थिक मंदी : कारणे,परिणाम आणि उपाय | मानसी राख | 184 |
| 50 | किंमत स्थैर्य व विकास दर समायोजनात पतधोरणाची भूमिका | प्रा. राम दगडखैर | 187 |
| 51 | सहकार चळवळ | डॉ. सुधीर गायकवाड | 190 |
| 52 | कृषी पर्यटन : एक शेतीपूरक व्यवसाय | डॉ. सुभाष देशमुख, स्वाती पानसंबळ | 193 |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी राखून ठेवलेले आहेत. प्रकाशकांच्या पूर्वपरवानगीशिवाय या अंकात लेखांचे पुनर्प्रकाशन करता येणार नाही. या अंकात व्यक्त झालेली मते व विचार हे त्या लेखाच्या लेखकांचे वैयक्तिक विचार आहेत त्याच्याशी संपादक किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ मालकी हक्कासंदार्भातील संपूर्ण जबाबदारी लेखाच्या लेखकांची असेल.*
**- मुख्य संपादक, रिसर्च जर्नी**

**Published by –**
**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258**

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 215 : Indian Economic Slowdown
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
January-2020

# भारतातील मानवी संसाधन विकास : सद्यस्थिती व आव्हाने

डॉ. हनुमंत पोपट शिंदे
सहाय्यक प्राध्यापक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
प्रितम प्रकाश महाविद्यालय(कला व वाणिज्य),
इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे-३९.
मो.नं. ९४२३३२१७३७/७२६३९००८११.
Email:drhpshinde@gmail.com

**गोषवारा(Abstract):**

मानवी संसाधनाला कोणत्याही देशाच्या विकासात अनन्यसाधारण महत्व असते. देशातील उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य व पर्याप्त वापर घडवुन आणण्यासाठी पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध असणे गरजेचे असते. ज्या देशांमध्ये विपुल प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध आहे परंतू मनुष्यबळ पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसेल अशा देशांना उपलब्ध साधनसंपत्तीचा सुयोग्य वापर घडवून आणता न आल्याने ते विकासाची अपेक्षित पातळी गाठू शकत नाहीत. याशिवाय जे देश लोकसंख्या विपुल आहेत तेथे अतिरिक्त लोकसंख्या ही आर्थिक विकासाच्या मार्गातील अडथळा ठरते. त्यामुळे देशात लोकसंख्येचे पर्याप्त प्रमाण असेल तरच त्या देशाचा विकास वेगाने होऊ शकतो. लोकसंख्येच्या पर्याप्त प्रमाणाबरोबरच उपलब्ध मानवी संसाधनाचा दर्जा व गुणवत्ता कशी आहे यावर देखील देशाच्या विकासाचा वेग अवलंबून असतो. त्यामुळ अलिकडील काळात मानवी संसाधनाच्या विकासाला महत्व प्राप्त झाले आहे. देशातील लोकांच्या राहणीमानाची पातळी, दरडोई उत्पन्न, पोषण, शिक्षण, संशोधन व कौशल्य यावर मानवी संसाधनाचा दर्जा व विकास अवलंबून असतो. प्रस्तुत शोध निबंधात भारतातील मानवी संसाधनाच्या विकासाची प्रवृत्ती, देशातील विविध घटकराज्यांतील मानव संसाधन विकासातील तफावत, मानव संसाधन विकासाबाबत भारताची प्रमुख देशांशी तुलना या घटकांवर प्रकाश टाकला असून देशाच्या मानव संसाधन विकास मार्गातील आव्हाने व मानवी संसाधनाच्या विकास मार्गातील अडथळे दूर करण्याच्या उपाययोजना यांची सविस्तर चर्चा केली आहे.

**किवर्डस्(Keywords):** मानवी संसाधन,UNDP, HDI, GDI, GII, MPI, कौशल्य, राहणीमान.

## १. प्रस्तावना (Introduction)

जागतिक भौगालिक क्षेत्रफळापैकी २.४ टक्के भूभाग भारताच्या वाट्याला आला असून जगातील एकूण लोकसंख्येपैकी १७.७१ टक्के लोकसंख्या देशात वास्तव्य करते. लोकसंख्या आणि भौगोलिक क्षेत्रफळाचा तुलनात्मक विचार करता भारतात लोकसंख्या अतिरिक्त प्रमाणात असल्याचे आढळते. देशाच्या विकासात मानवी संसाधनाला अनन्यसाधारण महत्व असले तरी अतिरिक्त लोकसंख्येमुळे भारतात अनेक समस्या निर्माण होत असून लोकसंख्येचे अतिरिक्त प्रमाण हा प्रमुख अडथळा ठरत आहे. अतिरिक्त लोकसंख्ये बरोबरच मानवी संसाधनाच्या दर्जाचा देखिल विकासावर परिणाम होतो.

देशातील मानवी संसाधनाच्या वास्तविक स्थितीवर प्रकाश टाकणे हा या अभ्यासाचा उद्देश असून प्रस्तुत शोध निबंधात भारतातील मानवी संसाधनाची सद्यस्थिती व प्रवृत्ती, देशातील विविध राज्यांमध्ये मानवी संसाधनाचा दर्जा, मानवी संसाधनांच्या विकासासंबंधी भारताची इतर देशांशी तुलना, मानवी संसाधनाच्या विकासातील